# दिनांक 25/04/2025

**1.** तळा सागरी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/04/2025 रोजी 03:00 वा च्या सुमारास मौजे खांबिवली आदिवासीवाडी ता.तळा येथे आरोपीत चालक रा.खांबिवली आदिवासीवाडी ता.तळा हा त्याचे ताब्यातील हांेन्डा कंपनीची मो.सा.नं.एम.एच.06/बी.वाय.1757 ही इंदापूर येथून त्याच्या राहत्या घरी खांबिवली आदिवासीवाडी ता.तळा येथे जात असताना मौजे खांबिवली गावचे हद्दीत आले असता चालक आरोपीत याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगात चालवून रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे हयगईने स्वतः चालवित असलेली ताब्यातील मोटार सायकल रोडचे डावे बाजुला स्लिप होउुन गाडीवरून पडुन सदरच्या अपघातामध्ये आरोपीत याने स्वतः च्या तसेच गाडीवर पाठीमागे बसलेले जखमी नामे शर्मिला महेश जाधव, माहिरा महेश जाधव, आराध्या महेश जाधव यांच्या तसेच स्वतःच्या लहान मोठया दुखापतीस कारणीभुत झाला तसेच फिर्यादी यांचा पुतण्या विहान महेश जाधव यास दुखापत झाल्याने त्यास पुढील उपचाराकरीता उपजिल्हा रूग्णालय माणगांव येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यास तपासुन मयत घोषित केले म्हणुन त्याच्या मरणास तसेच मोटार सायकलच्या नुकसानास कारणीभुत झाला.

याबाबत तळा पोलीस ठाणे गुरनं.15/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, BNS 2023 चे कलम 281,125,(a)125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/खीरिट हे करीत आहेत.

**2.** गोरेगांव सागरी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/04/2025 रोजी 12:35 वा च्या सुमारास मौजे खांडपाले गोवा- मुंबई हायवे रोडवर, माणगाव येथे आरोपीत चालक रा.शेलार ता.भिवंडी जि.ठाणे याने गोवा मुंबई रोडने महाड बाजूकडुन मुंबई बाजुकडे घेवुन जात असताना खांडपाले गोवा- मुंबई हायवे रोडवर, माणगाव यांचे ताब्यातील ट्रक क्र. एम.एच.04 जे.के.4324 हा रस्त्याचे परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने व अविचाराने चालवून माणगाव बाजूकडुन महाड बाजुकडे जाणा-या फिर्यादी यांचे इनोव्हा क्रिस्टा गाडी नं.एम.एच.09-4892 हीस समोरुन येवुन ठोकर मारुन अपघात करुन इनोव्हा क्रिस्टा गाडीचे नूकसानीस कारणीभुत होवून अपघात ठिकाणी न थांबता पळुन गेला.

याबाबत गोरेगांव पोलीस ठाणे गुरनं. 24/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184,134, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 281, 324(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/ललिता खाडे हे करीत आहेत.

**3.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/04/2025 रोजी 12:05 वा च्या सुमारास मौजे.सावेळे, ता कर्जत येथे आरोपीत क्र 01 व 02 दोन्ही रा.सावेळे,ता.कर्जत, यांनी संगनमत करून स्वत:चे फायदयाकरिता गोवंशीय जनावरे कोठून तरी कत्तलीसाठी चोरून आणून त्यांना लाकडी कंपाउंडमध्ये डांबून बांधून ठेवून गोवंशीय जातीच्या जनावरांची अवैध्य व बेकायदेशीर कत्तल करून गोवंशीय मांस एकूण 1,01,000/- रुपये व किमतीचे गोवंशीय जनावरे त्यांचे ताब्यात मिळून आले. सदर गुन्ह्यातील आरोपीत क्र 01 व 02 दिनांक व वेळ 24/04/2025 रोजी 21:52 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.111/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 325,303(2),3(5),महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम सन 1995 चे कलम 5(क) चे उल्लंघन 9(अ) प्रमाणे सह प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यात प्रतिबंध करणेबाबत अधिनियम 1960 चे कलम 11(1),(ड),(च),(ज) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/जयवंत वारा हे करीत आहेत.

**4.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/04/2025 रोजी 09:00 वा च्या सुमारास मौजे दहिवली गावचे हद्दीत पूणे मुंबई एक्सप्रेस हायवेवरील फुडमॉल येथे, ता.खालापुर येथे महिला फिर्यादी रा.ए-विंग, फ्टँट नं.01, लक्ष्मीगार्डन सोसायटी आंबेगाव बु. भारती विद्यापिठाच्या मागे कात्रज, पूणे या व त्यांची मुलगी असे ई-शिवनेरी बसने स्वारगेट ते दादर असा प्रवास करीत असताना दहिवली गावचे हद्दीत पूणे मुंबई एक्सप्रेस हायवेवरील फुडमॉल आलेवेळी फुडमॉल येथे चहा नाश्ता करण्याकरीत बस थांबली असता, फिर्यादी या खाली उतरून चहा नाश्ता करून बसमध्ये परत आल्या असता फिर्यादी यांनी त्यांचे शिटचे वरील सामान ठेवण्याच्या रँकमध्ये ठेवलेली खाकी रंगाची ट्रँव्हल्स बँगमध्ये ठेवलेली एकूण 2,70,000/- रुपये व किंमतीच्या दागिण्यांची लाकडी पेटी ही कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या उद्देशाने, स्वत:च्या फायद्याकरीता चोरून नेली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.114/2025, भारतीय न्याय संहीता कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/प्रशांत पाटील हे करीत आहेत.

**5.** रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/04/2025 रोजी 11:30 वा च्या सुमारास मौजे अष्टमी मराठा आळी माउली इनक्लीन रुम सी 201 फिर्यादी रा.अष्टमी मराठा आळी माउली इनक्लीन रुम सी.201 ता.रोहा यांचे राहते घरात एकूण 6,00,000/- रुपये व किमतीचे व किंमतीचे 20 वर्ष पुर्वी खरेदी केलेले दागीने फिर्यादि यांची आई मंदीरात गेली असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने कोणत्यातरी वस्तुने माउली बिल्डींगचे फ्लॅट नं.201 चे दाराची कडी कोयंडा तोडुन त्यावाटे आत प्रवेश करुन स्वत:च्या फायदयाकरिता घरफोडी चोरी करुन घेवुन गेले.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं. 85/2025, बी.एन.एस.कलम 305(अ),331 (1)(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई संजय पायक हे करीत आहेत.

## जुगार केसेस

**1.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/04/2025 रोजी 01:25 वा च्या सुमारास मौजे कोल्हारे येथे, आरोपीत रा. नेरळ पोलीस ठाणे, ता.कर्जत हे विनापरवाना बेकायदकशीर एकूण भारतीय चलनी नोटा एकुण रोख रक्कम. रु 19200/- रुपये किमतीचे सोरट जुगार चालवितांना स्थितीत मिळुन आले.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 65/2025 जुगार अधिनियम, 1867, कलम 12अ प्रमाणे, महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम 1887 चे कलम 12 (A) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/लोखंडे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 24.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 242 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,93,900/-रुपये इतका दंड आकारला आहे.